शहर पाणीपुरवठ्यावरून भाजप-सेनेमध्ये जुंपली

आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये आज मोर्चा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शिवसेनेने 'लबाडांनो पाणी द्या' या शीर्षाखाली गेल्या ३८ दिवसांपासून सुरू असणाऱ्या आंदोलनास उत्तर देत 'लबाड लांडगं ढोंग करतंय'या आशयाची पत्रके भाजपतर्फे वाटली. शुक्रवारी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या वतीने आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील क्रांती चौक ते गुलमंडी असा मोर्चा काढण्यात येणार असल्याने पाणी प्रश्नावरून महापालिकेचा राजकीय पट मांडण्याची तयारी शिवसेना आणि भाजप दोघांकडून सुरू करण्यात आली आहे. प्रशासकीय नियोजनातील अनागोंदीवरून सुरू असणारे आंदोलन भाजप नेत्यांनी स्वतःकडे ओढून घेतल्याने जलयोजनेतील 'लबाड' कोण हे स्पष्ट झाल्याची टीका विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केली.

शहरातील अनेक भागांत १२ दिवसाला पाणी येत असल्याने सर्वसामान्यामध्ये असणारा रोष भाजप नेत्यांच्या बाजूने वळावा यासाठी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या वतीने विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. पाणी योजनेतील अनागोंदीबाबत बोलताना अंबादास दानवे म्हणाले, 'या योजनेच्या कंत्राटदारास मुख्यमंत्र्यांसमोर देखील उभे केले जात नाही. त्यामुळे प्रशासकीय नियोजनातील त्रुटींबाबतच्या आंदोलनाला भाजपची नेते मंडळी राजकीय वळण देत आहेत. शहराला दिवसाला २४० दशलक्ष लिटर पाणी लागते. त्यापैकी फक्त १४० लिटरच पाणी येते. पूर्वीही ही परिस्थिती होती. मात्र, प्रशासकीय पातळीवरील नियोजनामुळे आणि महापालिका आयुक्तांच्या दुर्लक्षामुळे शहरात पाण्याची ओरड सुरू आहे. यात सुधारणा करण्याची गरज आहे. १६८० कोटी रुपयांवरून ही योजना कोणाच्या फायद्यासाठी २७५० कोटी रुपयांपर्यंत नेण्यात आली, या प्रश्नाचे उत्तर भाजपने द्यावे.' दरम्यान शिवसेनेच्या या आंदोलनावरून अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे यांनी शिवसेना नेत्यांवर गंभीर आरोप केले.

ते म्हणाले, 'नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण केला जात आहे. १६८० कोटी रुपयांची योजना देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मंजूर करण्यात आली. आता मोठे उद्योग शहरात येत असताना त्याला आड येता यावे म्हणून हे आंदोलन केले जात आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना का काम केले नाही, याचे उत्तर शिवसेनेने द्यावे. जायकवाडी धरणाच्या जॅकवेलचे काम ६५ टक्के पूर्ण झाले असून डिसेंबर २०२६ मध्ये योजना पूर्ण होईल.' मंत्री सावे आणि डॉ. भागवत कराड यांनी शिवसेनेकडून राजकारण होत असल्याचा आरोप केला.

या पत्रकार बैठकीनंतर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजपला या प्रश्नावर बोलण्याचा नैतिक अधिकार नसल्याचे म्हटले. डॉ. भागवत कराड, भगवान घडमोडे आणि विजया रहाटकर ही भाजपची नेते मंडळी महापौर होती. स्थायी समितीमध्ये भाजप सेनेची मंडळी आलटून-पालटून असायची. अशा योजनांच्या कार्यान्वयासाठी वेळ लागतो. त्यामुळे आम्ही केवळ नियोजनातील प्रशासकीय त्रुटीवर बोट ठेवत होतो. पण भाजपने हा विषय आता राजकीय केला आहे.

आता नियोजन सुधारण्यासाठी शहर पाणीपुरवठ्याचे काम पाहणाऱ्या १७ अभियंत्यांबरोबर आता उपशहर प्रमुखांची नियुक्ती करून पाठपुरावा करणार आहोत. उपअभियंत्यांबरोबर शहरप्रमुख आणि कार्यकारी अभियंत्यांच्या पुढे पदाधिकारी पाठपुरावा करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा दावा दानवे यांनी केला.

खरिपाच्या तोंडावर कृषी सहायकांचे काम बंद आंदोलन

परभणी : विविध मागण्यांसाठी खरिपाच्या तोंडावर कृषी सहायक संघटनेने गुरुवारपासून (दि. १५) काम बंद आंदोलन पुकारले आहे. पदनाम बदल आणि प्रत्येक कृषी सहायकास लॅपटॉप या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे.

कृषी सहायक संघटनेच्या वतीने दोन महिन्यापूर्वी काम बंद आंदोलनाची रीतसर नोटीस दिलेली होती. त्याची दखल घेतली गेली नाही. बुधवारी (दि. १४) शासनाने चर्चेसाठी बोलावणे अपेक्षित होते. मात्र, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावले गेले नाही त्यामुळे काम बंद आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला. आंदोलन काळात शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून तालुका स्तरावर जमा होणारे कृषी सहायक आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या कामावर लक्ष ठेवतील. पदनाम बदलले जात नसल्यामुळे कृषी सहायक नाराज असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

मॉडेल कॉलेजच्या प्राचार्यपदी डॉ. दांडगे

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या घनसावंगी येथील मॉडेल कॉलेजच्या प्राचार्यपदी माजी परीक्षा नियंत्रक, लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. सतीश दांडगे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी गुरुवारी डॉ. रामराव चव्हाण यांच्याकडून पदभार स्वीकारला. डॉ. दांडगे हे या आधीही २०१६-१७ मध्ये मॉडेल कॉलेजच्या प्राचार्यपदी कार्यरत होते. दरम्यान, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गंगापूर येथील मुक्तानंद महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. रामराव जनार्दनराव चव्हाण यांची नियुक्ती झाली आहे. डॉ. चव्हाण यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला.

मराठवाड्यात दोन सैनिकी शाळांना मंजुरी

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : संरक्षण मंत्रालयाच्या अधिकारांतर्गत मान्यता मिळणाऱ्या दोन सैनिकी शाळांना मराठवाड्यात मंजुरी मिळाली आहे. नांदेड जिल्ह्यातील सगरोळी आणि बीडमधील अंबाजोगाईच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेला मंजुरी मिळालेल्या या शाळा चालू शैक्षणिक वर्षापासूनच सुरू होण्याची अपेक्षा आहे.

केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने देशाच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभरात शंभर सैनिकी शाळा स्थापण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशामध्ये गतवर्षी ४१ सैनिकी शाळांना मंजुरी मिळाली आहे. महाराष्ट्रात गतवर्षी व यावर्षी मिळून सात सैनिकी शाळांना परवानगी देण्यात आली आहे. त्यात मराठवाड्यातील वरील दोन शाळांना यावर्षी मंजुरी मिळाली आहे. तर एक शाळा विदर्भातील आहे. गतवर्षी मंजुरी मिळालेल्या शाळांमध्ये अहमदनगरमध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिकी स्कूल, सांगली जिल्ह्यातील एस. के. इंटरनॅशनल स्कूल, नागपूरची भोन्सला मिलिटरी स्कूल व कुर्डुवाडी (जि. सोलापूर) जवळील अकुलगाव येथे आदर्श पब्लिक स्कूल यांचा समावेश आहे.

सैनिकी शाळांमुळे सैन्यामध्ये अधिकारी होण्याची संधी मिळणार आहे. शिस्त, सेवा, देशप्रेम, साहस या गुणांचा विकास नव्या पिढीमध्ये करण्यासाठी सैनिकी शाळांची गरज आहे.
- एस. पी. कुलकर्णी, सेवानिवृत्त मेजर, रक्षामंत्री पदकप्राप्त

डिफेन्स मिनिस्ट्रीने १०० सैनिकी शाळा स्थापन करण्याचा निर्णय यापूर्वी घेतला होता. त्याअंतर्गत योगेश्वरी शिक्षण संस्थेने सैनिकी शाळा स्थापण्यासाठी प्रस्ताव पाठवला होता. यावर्षी तो प्रस्ताव मंजूर करण्यात आला. तत्पूर्वी सातारा सैनिकी स्कूलच्या पथकाने संस्थेच्या परिसराची पाहणी केली. संस्थेकडे पूर्वीचेच पाच एकर मैदान आहे. अन्य चार एकरची व्यवस्था केलेली आहे. गोळीबारीच्या सरावाचा भाग, वसतिगृह, शिक्षक अशी व्यवस्था आहे. मुख्य म्हणजे सीबीएसई पद्धतीने सैनिकी शाळांमध्ये शिक्षण राहील. ८० ते १२० मुलांची पहिली तुकडी आहे. देशपातळीवर होणाऱ्या परीक्षेतून ही तुकडी निवडली जाणार आहे.
- चंद्रशेखर बर्दापूरकर, अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था

समाजकल्याणच्या निधीकपातीची भूमिका अयोग्यच

संजय शिरसाट यांची पाठराखण

छत्रपती संभाजीनगर : समाजकल्याण विभागाचा निधी कापणे चूकच असल्याचे सांगत केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी संजय शिरसाट यांनी बाजू घेतली. लाडक्या बहिणींना पैसे द्यावेतच, पण समाजकल्याणच्या निधीस कात्री लावणे चूकच असल्याचे आठवले म्हणाले.

निधी नसल्याने मंत्रालयच कशाला हवे, असा संतप्त सवाल करत शिरसाट यांनी अजित पवार यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे केले होते. मंत्री शिरसाट यांनी रागाने ती भूमिका मांडली असेल. खाते बंद करण्याच्या वक्तव्यामागेही ही भावना असावी. लाडक्या बहिणींना १ हजार ५०० ऐवजी २ हजार १०० रुपये द्यायला हवे. पण यातील निधी वळविणे चुकीचेचे आहे. दरम्यान, अजित पवार आणि शरद पवार आमच्या पक्षात आले तर आनंदच आहे. मात्र, असे होण्याची शक्यता कमीच आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांची राजकीय युती होण्याची शक्यता कमी आहे. तसे झाले, तर महाविकास आघाडीला अधिक फटका बसेल. राज ठाकरे यांना काँग्रेस स्वीकारणार नाही, असे भाकीतही आठवले यांनी वर्तवले. दरम्यान, संभाजीनगरच्या महापालिका निवडणुकीमध्ये रिपब्लिकन पक्षास महायुतीमध्ये १० ते १२ जागांची मागणी करू, असेही आठवले म्हणाले.

जालन्यात बेसुमार वाळू उपसा; आमदार लोणीकरांचा आरोप

लोकसत्ता वार्ताहर

जालना : जिल्ह्यात बेसुमार अवैध वाळू उपसा होत असून, त्याबाबत संबंधित प्रशासकीय यंत्रणा गंभीर नसल्याचा आरोप सत्ताधारी आमदार बबन लोणीकर यांनी केला आहे. माध्यम प्रतिनिधींशी बोलताना लोणीकर म्हणाले, 'तहसीलदारांवर हल्ला करण्यापर्यंत वाळूमाफियांची मजल गेली आहे. वाळूघाटाच्या निविदा अंतिम झालेल्या नसतानाही अनेक ठिकाणी वाळू उपसा आणि वाहतूक सुरू आहे. गोदावरी नदीच्या काठावरील अंबड आणि घनसावंगी तालुक्यातून दररोज जवळपास पाचशे मालवाहू हायवा वाहनांतून अहिल्यानगर, बीड इत्यादी जिल्ह्यांत वाळू जाते. या भागातील तीस-पस्तीस गावांजवळच्या गोदावरी नदीपात्रात जेसीबी आणि यंत्रांच्या माध्यमातून वाळू उपसा सुरू असतो. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर केवळ दंडात्मक कारवाई करून काही साध्य होत नाही, तर कायदेशीर प्रक्रिया करून जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव केला पाहिजे. त्यांच्या मालमत्तांमधून महसूल वसूल केला पाहिजे. अंबड आणि घनसावंगी तालुक्याप्रमाणेच जिल्ह्यातील भोकरदन, तसेच जाफराबाद तालुक्यांतून दररोज पाचशेपेक्षा अधिक हायवांमधून अवैध वाळू वाहतूक होत असल्याचा आरोपही लोणीकर यांनी केला. या दोन्ही तालुक्यांत अवैधरीत्या उपसा केलेल्या वाळूचा पुरवठा बुलडाणा, वाशिम, अकोला इत्यादी जिल्ह्यांत होतो. विधिमंडळ अधिवेशन, जिल्हा नियोजन समिती आणि अन्य शासकीय बैठकांमध्ये आपण अनेकदा हा प्रश्न उपस्थित केला असला, तरी जिल्हा पातळीवरील संबंधित प्रशासकीय यंत्रणा त्याकडे गांभीर्यपूर्वक पाहत नाही, असा आरोपही त्यांनी केला. परतूर आणि मंठा तालुक्यांत विविध योजनांखाली बेघरांना १५ हजार घरकुले मंजूर आहेत. त्यांना नियमाप्रमाणे विनामूल्य काय, विकतही वाळू मिळत नाही. जिल्ह्यात रस्ते बांधकाम आणि अन्य शासकीय योजनांखालील कामांनाही वाळू उपलब्ध होण्यात अडचणी येतात. सर्व नियम धाब्यावर बसवून जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असून, त्यासाठी गोदावरी, पूर्णा, तसेच अन्य काही नद्यांच्या पात्रात यंत्रांच्या साह्याने मोठ-मोठे खड्डे केले जात आहेत, असा आरोपही आमदार लोणीकर यांनी केला.

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११० ००१, फोन : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेब. : www.pnbhousing.com
शाखा पत्ता : ई-१, ई-२ आणि ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेन्टर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१

तारखेनुसार सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३(१) सहवाचता सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँण्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या प्रकरण ३ च्या कलम १३(२) अंतर्गत सूचना

आम्ही, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे ''पीएनबीएचएफएल'' म्हणून संदर्भित) ई-१, ई-२ आणि ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेन्टर, अदालत रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१ येथे स्थित आमच्या औरंगाबाद शाखा कार्यालयाद्वारे, सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे ''कायदा'' म्हणून संदर्भित)च्या प्रकरण ३च्या कलम १३(२) अंतर्गत एक मागणी सूचना जारी केली होती. हप्ते/ व्याज न भरल्यामुळे तुमचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया/ नॅशनल हाऊसिंग बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून वर्गीकृत करण्यात आले असल्याने, खाली नमूद केलेल्या सर्व कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदारांना आमच्या अधिकृत अधिकाऱ्यांमार्फत सदर ही मागणी सूचना जारी करण्यात आली आहे. त्यातील मजकूर म्हणजे तुम्ही मुद्दल, व्याज इत्यादींचे हप्ते भरण्यात केलेली कसूर. थकबाकीची रक्कम खाली नमूद केली आहे. शिवाय, कारणांसह, आम्हाला वाटते की, तुम्ही मागणी सूचनेची सेवा टाळत आहात आणि म्हणूनच सदर ही मागणी सूचनेची प्रकाशन, जो वरील कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गतदेखील आवश्यक आहे. तुम्हाला याद्वारे पीएनबीएचएफएल यांना सदर या मागणी सूचनेची प्रकाशन तारखेपासून ६० दिवसांच्या आत अद्ययावत व्याज आणि शुल्कासह वरील रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे, अन्यथा, पीएनबीएचएफएल कर्जदार आणि जामीनदारांच्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यासह, सर्व किंवा कोणत्याही एक किंवा अधिक सुरक्षित मालमत्तेवर, वरील कायद्याच्या कलम १३(४)च्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींनुसार आवश्यक कारवाई करेल.

तुमचे लक्ष वेधण्यासाठी, वित्तीय मालमत्तांचे सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२च्या कलम १३च्या उपकलम (८)च्या तरतुदीकडे आमंत्रित केले आहे, ज्या अंतर्गत तुम्ही जाहीर लिलावाद्वारे, सार्वजनिक किंवा खासगी करारद्वारे कोटेशन मागवून, सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपर्यंत पीएनबी एचएफएल यांनी केलेल्या सर्व खर्च, शुल्क आणि खर्चासह संपूर्ण थकबाकीची रक्कम देऊ शकता/ भरू शकता. कृपया हे देखील लक्षात ठेवा की, जर जाहीर लिलावाद्वारे, कोटेशन मागवून, सार्वजनिक किंवा खासगी करारद्वारे सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना प्रकाशित होण्यापूर्वी पीएनबी एचएफएल यांनी केलेल्या खर्चासह संपूर्ण थकबाकीची रक्कम सादर केली गेली नाही, तर तुम्हाला त्यानंतर सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्याचा अधिकार राहणार नाही. शिवाय, तुम्हाला सदर निर्देशित कायद्याच्या कलम १३(१३) अंतर्गत विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे वरील सुरक्षित मालमत्ता हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

कर्ज खाते क्रमांक आणि शाखा	कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव आणि पत्ता	जामीनदाराचे नाव आणि पत्ता	गहाण ठेवलेली मालमत्ता	मागणी सूचनेची तारीख	मागणी केलेली रक्कम
एचओय्/एआरएनजी/ ०१२२/९४४३५५ बी.ओ. : औरंगाबाद	श्री./श्रीमती प्रल्हाद मोरे आणि श्री./श्रीमती प्रिती प्रल्हाद मोरे - सीटीएस क्र. ६६७ हर्सूल औरंगाबाद बाकळे, गल्ली धनगर वाडा, औरंगाबाद, एमएच, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत-४३१ ००१, आणि रो हाऊस क्र. ०८, गट क्र. ३०३/३/पी, हिरा पार्क, हर्सूल, औरंगाबाद, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१ तसेच येथे : एच नं. १४९, हरसिद्धीजवळ, औरंगाबाद, मंदिर हार्दिक, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत-४३१ ००१.	एनए	रो हाऊस क्र. ०८, गट क्र. ३०३/३/पी, हिरा पार्क, हर्सूल, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१.	०७-मे-२०२५	रु. ३२,६२,९४३.३२

ठिकाण : औरंगाबाद, दिनांक : १५.०५.२०२५ — सही/- अधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.,अंबाजोगाई
(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)
मागणी सूचना
जा.क्र. सरफेसी/०४/७०२७-१११७/२८/२०२५-२६
दिनांक १३-०५-२०२५
सिक्युरिटायझेशनच्या १३ (२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२ . पासुन तुमचे कर्जखाते दिनांक ३०.०९.२०१८ पासुन एन.पी.ए. झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेतः

क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम	कर्जदार / जामिनदार	सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता	सध्याची थकबाकी
१) खाते क्र. ७०२७-१११७ रु. ४,००,०००/-	१. श्री. अर्जुन लहुदास तुरे (कर्जदार) पत्ताः गोविंद हेअर ड्रेसेस, नाथ टॉकीजच्या समोर, परळी-वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५ २. श्री. रविंद्र व्यंकटी कस्पटे पत्ता:- मु. पो. डाबी, ता, परळी वैजनाथ, जि. बीड ४३१ ५३० ३. श्री. गोविंद संभाजी मुंडे पत्ताः- मु.पो. डाबी, ता. परळी-वैजनाथ, जि. बीड ४३१ ५३०	(मालमत्ता धारकाचे नाव :- अर्जुन लहुदास तुरे) कर्जदार/गहाणदार श्री अर्जुन पिता लहुदास तुरे यांच्या मालकीचे घर ज्याचा ग्रामपंचायत घर क्र. ५६ त्यांचे क्षेत्रफळ पूर्व-पश्चिम २६ फुट आणि दक्षिण- उत्तर - २१ फुट एकुण क्षेत्रफळ ५४६ स्वे. फु. त्यावरील घर व बांधकामासह ज्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे :- पूर्व :- राजाभाऊ तुरे यांचे घर पश्चिम :- रस्ता दक्षिण :- विठ्ठल रखमाई मंदिर उत्तर :- रस्ता (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)	मुद्दल + ब्याज एकुण रु. ९,१०,३१२/- दिनांक ३०.०४.२०२५ रोजी + पुढील व्याज १५.५०% दिनांक ०१.०५.२०२५ पासुन

* वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
* अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत. अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २७.०७.२०१७ ब. गहाणखत नोंदणी दिनांक २०.०७.२०१७ (गहाणखत नोंदणी क्र. २१४१/२०१७) ५. म्हणजे, तुम्ही मंजूर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते छ्झ म्हणून वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही. ६. वर नमूद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल + व्याज एकुण रु.९,१०,३१२/- दिनांक ३०.०४.२०२५ अधिक दिनांक ०१.०५.२०२५ पासून पुढील व्याज १५.५०% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक १४.०७.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहेः अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार. ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे. क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडून घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे. ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडून सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडून आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते. ७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

श्री. अनंत गोपाळराव देशपांडे
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह. बँक म. अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो. ७६६६५७७९००
ठिकाणः - अंबाजोगाई

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि.)
नोंदणीकृत कार्यालयः सहावा मजला, बी बिल्डिंग, गंगा टूनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र, ४११०१४ शाखा कार्यालय युनिटः दुसरा मजला, पुनम चेंबर्स, पीएनबीच्या वर, नवीपेठ, जळगाव, महाराष्ट्र -४२५००१
ई-लिलाव-विक्री सूचना
सर्फेसी अधिनियमांतर्गत अचल अनामत मत्तेची विक्री

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८ व ९ सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("अधिनियम") अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाणकार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, कारण १७ नोव्हें २०२३ पासून पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड हे नाव बदलून गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे करण्यात आले आहे. (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड आणि मूलतः जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक लिमिटेड कंपनी या नावाने स्थापित) (सदर अधिनियमानुसार यापुढे "सुरक्षित धनको" असा उल्लेख करण्यात येईल) कडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत सूचनेच्या अनुषंगाने सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स मधील नियम ८ व ९ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत ताबा घेतलेला आहे.

सदर अनामत मत्तांची ई-लिलावाच्या माध्यमातून १६/०६/२०२५ रोजी **"जशी आहे जेथे आहे, जशी आहे जे काही आहे आणि तेथे जे काही आहे"** तत्त्वावर करण्यात येईल. याद्वारे आम जनतेस हे सूचित करण्यात येते की **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून जाहीर लिलाव राबविण्यात येणार आहे. विक्रीच्या अटी व शर्तीसाठी कृपया जीएचएफएल/ सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे **www.grihumhousing.com** येथे दिलेली लिंक पाहावी.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना दिनांक व थकबाकी रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (इ)	बयाणा रक्कम (आ.कि. च्या १०%) (एफ)	बयाणा रक्कम प्रस्तुतीकरण दिनांक (जी)	बोली वृद्धी (एच)	मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ (आय)	लिलाव दिनांक आणि वेळ (जे)	असल्यास ज्ञात बोजे / न्यायालयीन खटले (के)
१	कर्ज क्र. LAP011720000000506359 संजू उमरसिंग पाटील (कर्जदार) भारतीभाई संजय पाटील (सह-कर्जदार)	सूचना दिनांकः ०९/१२/२०२४ एकूण थकबाकीः दि. ०९/१२/२०२४ नुसार वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या वार्षिक १६% व्याजासह रु. ६७५६६२/- (रुपये सहा लक्ष पंच्याहत्तर हजार सहाशे बासष्ट फक्त) देय आहेत.	प्रत्यक्ष	सीटीएस क्र. ४०५, क्षेत्रफळ सुमारे ६८.२० चौ.मी., ग.प.ह.क्र. २६७, नागलवाडी, ता. चोपडा आणि जिल्हा जळगाव. पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस- सीटीएस क्र. ३६७ विठ्ठल वसंत कोळी, उत्तरेस- सीटीएस क्र. ४०४ दगडू काळू पाटील, दक्षिणेस- सीटीएस क्र. ४०६, पदसिंग दगडू पाटील.	रु. ९,३५,५५०/- (रुपये नऊ लक्ष पस्तीस हजार पाचशे पन्नास फक्त)	रु. ९३,५५५/- (रुपये त्र्याण्णव हजार पाचशे पंचावन्न फक्त)	३०/०५/२०२५ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत	१०,०००/-	२६/०५/२०२५ (स.११-दु.४)	१६/०६/२०२५ (स.११-दु.२)	निरंक

इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी बोली सादर करण्याअगोदर सुरक्षित धनकोची शाखा आणि लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तांना भेट द्यावी आणि स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्के, बोजे आणि तिसऱ्या पक्षाचे हित इ. बाबत चौकशी करावी आणि सर्व प्रकारे स्वतःची खात्री करून घ्यावी. मालमत्तेशी संबंधित सर्व वैधानिक देणी म्हणजे मालमत्ता कर, वीज / पाणी बिलाची थकबाकी आणि असल्यास, इतर शुल्के यांबाबत चौकशी करण्याची आणि त्यांचा भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदाराची असेल. इच्छुक बोलीदारांना ई-बोलीसाठी लिलाव सेवा पुरवठादार सी१ इंडिया प्रा.लि., पत्ता - प्लॉट क्र. ६८, तिसरा मजला, गुडगाव, हरयाणा -१२२००३ यांचेकडे पोर्टलवर नोंदणी करणे आणि पुरेसा वेळ असतांना लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. हेल्पलाईन क्रमांक -७२९१९८११२४, २५, २६ सपोर्ट ईमेल आयडी - Support@bankeauctions.com. **संपर्क व्यक्ती -धरणी पी., ईमेल आयडी-** dharani.p@c1india.com, **संपर्क क्रः ९९४८१८२२२२.** कृपया लक्षात घ्यावे की संभाव्य बोलीदार केवळ त्यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त